| | |
|---|---|
| MHSN060009292024 | PWDVA Appln. 31/2024<br>Miraj City Police Station<br>Rupali Babaso Sakate Vs. Sachin Babaso Sakate |

## निशाणी ४२ वरील आदेश

यातील अर्जदार हिने तिचेविरुध्द निशाणी ३४ व निशाणी ३६ या अर्जावर झालेला विना म्हणणेचा आदेश रद्द होणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार हिने कथन केले आहे की, अर्जदार हिला काही वैयक्तिक कामामुळे आवश्यक माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच सदरच्या कालावधीमध्ये अर्जदार ही आजारी होती. त्यामुळे अर्जदार हिला विहीत मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. सदर अर्जावर अर्जदार हिचे म्हणणे दाखल न झालेस तिचे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्जदार हिचेविरुध्द झालेल्या विना म्हणणेचा आदेश रद्द व्हावा अशी विनंती केली आहे.

३. याउलट जाबदार याने निशाणी ४५ प्रमाणे सदर अर्जास आपले म्हणणे दाखल केलेले असून अर्जदार हिची कथने नाकारलेली आहेत. तसेच जाबदार यांनी कथन केले की, अर्जदार ही आजारी असलेबाबत कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्याचप्रमाणे यातील जाबदार यांनी सदरचे अर्ज दाखल करुन ब–याच तारखा होऊन देखीलही अर्जदार यांनी म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली. तसेच वैकल्पिकरित्या अशी विनंती केली की, जर सदरचा अर्ज मंजूर करावयाचा झालेस अर्जदार हिचेवर कॉस्ट बसविणेत यावी.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. यातील जाबदार यांनी निशाणी ३४ प्रमाणे फौ.प्र.संहिता कलम ३४० प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. तसेच निशाणी ३६ प्रमाणे साक्षीसमन्स काढणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदरचे दोन्ही अर्ज हे दिनांक ११.०७.२०२५ रोजी दाखल करण्यात आलेले आहेत. त्यानंतर अर्जदार हिने ब–याच

तारखा होऊनसुध्दा आपले म्हणणे सादर न केलेने तिचेविरुध्द दिनांक १८.०८.२०२५ रोजी विना म्हणणेचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. यातील अर्जदार हिने म्हणणे दाखल करणेस विलंब झालेचे कारण नमूद केले आहे की, अर्जदार हिच्या वैयक्तिक अडचणीमुळे तिला आवश्यक माहिती उपलब्ध झाली नाही, तसेच सदर कालावधीमध्ये ती आजारी होती. यातील अर्जदार हिने ती आजारी असलेबाबत कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. प्रस्तुतकामी यातील अर्जदार व जाबदार तर्फे वकिलांचा निशाणी ५ व निशाणी १५ या अर्जांवर युक्तीवाद ऐकला असून सदरचे प्रकरणात जाबदार यांनी निशाणी ३४ व ३६ प्रमाणे अर्ज दाखल केलेले आहेत. सदरचे अर्ज गुणदोषावर चालून निर्णय होणेकरीता अर्जदार हिला तिचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. अर्जदार हिचे म्हणणे दाखल झालेस सदरचे अर्ज हे गुणदोषावर निकाली होणेस मदतच होणार आहे. जाबदारतर्फे वकिलांनी अर्जदार हिचेवर कॉस्ट बसविणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता दिनांक ११.०७.२०२५ ते दिनांक १८.०८.२०२५ या कालावधीमध्ये प्रस्तुतचे प्रकरण हे आदेशाकरीता देखील नेमले होते. तसेच अर्जदार हिने निशाणी ३६ च्या अनुषंगाने काही कागदपत्रे देखील दरम्यानच्या कालावधीमध्ये दाखल केलेले आहेत. त्यामुळे अर्जदार हिचेवर कॉस्ट बसविणे योग्य वाटत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार हिचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. अर्जदार हिचेविरुध्द निशाणी ३४ व ३६ खाली झालेल्या म्हणणे नाहीचा आदेश रद्द करण्यात येऊन अर्जदार हिला सदर अर्जावर म्हणणे सादर करणेस परवानगी देणेत येत आहे.
३. उभयंतांनी नोंद घ्यावी.

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

ठिकाण –मिरज.
दिनांक –१२.०९.२०२५.

(अनिरुध्द एस. राणे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज